Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March-2018

Special Issue – LIV

## Emerging Trends and Issues in Research

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home About Us Organization Commission Universities Colleges Publications

UGC Approved List of Journals

You searched for **research journey**

**Total Journals : 2**

|| Home ||

Show 25 entries Search:

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| View | 1 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub. Yevla | | 23487143 |
| View | 2 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | - | 23487143 |

Showing 1 to 2 of 2 entries Previous 1 Next

**Executive Editor of the issue :**

**Mr. Digambar Kulkarni (Dept. of English)**
**Mr. Amol Mahajan (Dept. of Geography)**
Hon. Shri. Annasaheb Dange Arts, Commerce & Science College,
Hatkanangale, Dist. Kolhapur

**Chief Editor :**
**Dr. Dhanraj Dhangar (Yeola)**

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

**This Journal is indexed in :**
- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
March 2018

## INDEX

| Sr. No. | Title of the paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Power Politics : An Assessment of '*Killing Kennedy*' by Bill O'reilly and Martin Dugard | **Digambar Kulkarni** | 05 |
| 2 | Problems in Drought Prone Area of Kavathe Mahankal Tahsil : A Geographical Study | **Mr. Amol Mahajan** | 10 |
| 3 | Geographical Investigation of Changing Cropping Pattern in Panchaganga Basin in Maharashtra | **Dr. M. N. Survase** | 15 |
| 4 | *'Dhavad'* the Iron-smelters: An Ethno-archaeological Study and Reconstruction of their Traditional Wisdom System | **Dr. Niranjan Kulkarni** | 24 |
| 5 | Role of Women Co-operative Credit Societies in India | **Smt. Sunita Telsinge** | 27 |
| 6 | Impact of Irrigation on Methods of Water Application in Sangli District, Maharashtra- A Geographical Analysis | **Mr. Amol More & Dr. P.V. Patil** | 33 |
| 7 | The New Business of Business Leaders: Talent Management | **Miss. Vandana Kharat** | 38 |
| 8 | Geographical Indication and Intellectual Property Rights | **Mr. Amol Mahajan** | 42 |
| 9 | Skill Development in Higher Education: Challenges and Recommendation | **Mr. Sudam Chakradhari** | 46 |
| 10 | Impact of Green Revolution on the Output of Selected Agricultural Crops in Kolhapur District | **Sameer H. Gaikwad** | 48 |
| 11 | दिव्यांगाना उच्च शिक्षणातील समान संधी : एक आव्हान | **डॉ. अमर कांबळे** | 52 |
| 12 | ग्रामीण भागातील दुध उत्पादन व व्यवस्थापनाच्या दृष्टीने घोसरवाड गावचा सूक्ष्म अभ्यास | **सपना लवटे, योगेश बदामे व प्रा. आर. एस. कदम** | 55 |
| 13 | भारतीय समाजाच्या पितृसत्तेच्या चौकटीची जडणघडण, लिंगभेद आणि स्त्रिया | **डॉ. संघमित्रा वि. सरवदे-पाचपिंडे** | 59 |
| 14 | 'महाराष्ट्रातील भटक्या- विमुक्त जमातींच्या चळवळींचा समाजशास्त्रीय अभ्यास' | **प्रा.दत्तात्रय दे. शिंदे** | 64 |
| 15 | पर्यावरण संवर्धन आणि संगोपन: 'नॅक'च्या दृष्टीकोनातून महाविद्यालयाचे उत्तरदायित्व | **प्रा. दिगंबर सुखदेव कुलकर्णी** | 69 |
| 16 | चंद्रसेन विराट कि गज़लो में चित्रित दलित चेतना | **प्रा. विजयकुमार साठे** | 72 |

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor-**

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 54 : Emerging Trends and Issues in Research
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018

# भारतीय समाजाच्या पितृसत्तेच्या चौकटीची जडणघडण, लिंगभेद आणि स्त्रिया

**डॉ. संघमित्रा वि. सरवदे-पाचपिंडे**
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग
मा. अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले जि. कोल्हापूर
फो.7709566552, ईमेल:sanghmitra99@gmail.com

स्त्री पुरुष समानतेचा प्रश्न नवसमाजरचनेचा आणि परिवर्तनवादी चळवळीचा कळीचा प्रश्न आहे. तो केवळ भाषिक स्वरुपाचा नसून त्याला आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अंगे आहेत. ही सर्व अंगे समाजाची पितृवंशतेची चौकटीत सिध्द केली आहेत. ही चौकट दृढ करण्यामध्ये संस्कृतीचा खूप मोठी भूमीका आहे. ही व्यवस्था स्त्री आणि पुरुषांना विषम हक्क व दर्जा बहाल करते. हा दर्जा निसर्गाने मूल जन्माला घालण्याच्या संदर्भात दोन लिंगाना विषम भूमिका दिल्या आहेत, ही भूमीका लक्षात घेऊन स्त्री-पुरुष विषमतेचे समर्थन होत असताना दिसते. स्त्रिया ज्या सांस्कृतिक कल्पना आणि मूल्य आत्मसात करतात, आपल्या स्वतः बद्दलच्या प्रतिमांना आकार देतात आणि भविष्याबद्दलची दृष्टी बनवितात त्या कल्पना पितृवंशतेच्या चौकटीतून येतात. स्त्रिया या कल्पना मान्य करतात, दुय्यमत्त्व मान्य करतात. एकंदरीत त्यांचे दुय्यमत्त्व हे नैसर्गिक किंवा दैवी नसून मानवी आहे. समाजाची रचना अशी झाली आहे की पुरुषांच्या हाती अर्थ व सत्ता केंद्रित झाली आहे.

भारतीय समाजाच्या जडण घडणी मध्ये वर्गीय व जातीय विषमते बरोबरच स्त्री-पुरुष विषमता हामूलभूत घटक आहे. प्रत्येक वर्ग व जातीच्या अंर्तगत स्त्री आणि पुरुष यांच्यात भेद आहेत. या व्यवस्थेने स्त्रियांचे स्थान दुय्यम ठेवले आहे. स्त्री पुरुष यांच्यातील सामाजिक भेद आणि स्त्रियांचे गौण स्थान यांची कारणे नैसर्गिक असतात. मात्र माणसांमध्ये तसे नाही. आपल्या लहानपणी झालेले संस्कार, आपण आयुष्यभर एकमेकांशी व्यवहार करत असताना एकमेकांवर करतो ते संस्कार, आपले विचार, आपले साहित्य, कला, शिक्षण, यांच्यातून स्त्री- पुरुष भेद समाजामध्ये अकार घेत असतो. म्हणून त्याला आपण सांस्कृतिक म्हणतो. समाज अशा सांस्कृतिक पध्दतीची रचना करत असतो. या सांस्कृतिक रचनेत लिंगभावाची जपवणूक वृत्तवैकल्य, सण समारंभ, दैनंदिन भाषेचा वापर, कुटुंबांतर्गत आणि कौटुंबिक नात्यामध्ये पाळावयाच्या चालीरीती यांच्या अधारे लिंगभावाची जपणूक संस्कृती करते. स्त्रिया या सांस्कृतिक रचनेत स्वतः बद्दलच्या प्रतिमांना आकार देतात आणि भविष्याबद्दलची दृष्टी बनवितात.

**उद्दिष्ट** : भारतीय समाजातील पितृवंशतेच्या चौकटीत लिंगभेदाची सांस्कृतिक चौकट स्पष्ट करणे.

**लिंगभेदाची व्याख्या :**

स्त्रिया आणि पुरुष यांच्यामध्ये जे शारीरिक भेद आहेत. त्यांना आपण लैंगिक फरक म्हणतो. मात्र समाजात त्यांच्यात जे वेगवेगळया प्रकारचे भेद आहेत त्यांना लिंगभावी भेद, लिंगभावाचे फरक म्हणू शकतो. म्हणजे एखाद्या व्यक्तीचे लिंग जन्मतःच (किंवा तदपूर्वी) ठरलेले असते. मात्र **लिंगभाव म्हणजे लिंगावर आधारलेल्या समाजाच्या भावना आणि दृष्टिकोन.**[1] (पृ २) पितृवंश आणि मातृवंश समाजामध्ये पारंपारिक लिंगभाव संबंधाचे विशिष्ट स्वरुप दिसते. हे लिंगभाव इतर अनेक घटकांसह अर्भकांना आणि स्त्रियांना दिल्या जाणा-या उच्चतम मान्यतेतून घडतात. लिंगभावातील फरकाला सतत नवीन समर्थन मिळत असते. समाजाच्या

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 54 : Emerging Trends and Issues in Research
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018

विविध अंगाने तो जटील अकार घेतो. स्त्रियांसाठी वेगळ्या प्रथा परंपराचे दृढीकरण केले जाते. यासाठी आधूनिक तंत्रज्ञानाचाही उपयोग या संस्था करतात. लिंगभावाचा संस्कार हा पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेतून दृढ होत जातो. छाया दातार पुरुषप्रधानतेची व्याख्या अशी करतात की, एक प्रकारे स्त्रियांचे शरीर, प्रजनन व लैंगिकता आणि उपजिविकेचे उत्पादन करण्यासाठी लागणारे श्रम यांच्यावरील वासाहतिक वर्चस्व म्हणजे पुरुषप्रधानता (पुरुषशाही) अशी व्याख्या करता येईल.[२]

**कुटुंब व्यवस्थेतील लिंगभेद :**

पुरुषप्रधान व्यवस्था, जातीव्यवस्था, धर्म व्यवस्था आणि वर्ग व्यवस्था ही हातात हात घालून चालणारी समग्र व्यवस्था आहे. या व्यवस्थेची सुरुवात कुटुंबातून होते. कुटुंबामधील संबंध केवळ रक्ताचे आणि प्रेमाचे नसून ते सत्तेचे आणि अधिकाराचे देखिल असतात. पितृसत्ताकतेमध्ये पुरुष कुटुंबप्रमुख स्त्रियांवर नियंत्रण व दुय्यमता आदि बाबी येतात.[३] (पृ ३) स्त्रियांना तिच्या जन्मापासूनच दुय्यम वागणूकीला सामोरे जावे लागते. तिच्या जन्माचे स्वागत होत नाही. सर्वसाधारणपणे मुलीला एक दायित्त्व किंवा बोजा म्हणून मानले जाते. काही राजपुतांमध्ये मुलीचा जन्म झाल्यानंतर लगेच तिला मारण्यात येत असे. कर्नल टॉडच्या मते, "ज्या दिवशी कन्येचा जन्म होई त्या दिवसाला शापित समजले जाई." [४] तिचा जन्म झालाच तर जन्माची परवड तिच्या वाट्याला येते व ती हे सर्व सहन करते या सहन करण्यात तिच्यावर लहानपणापासून केले संस्कार कारणीभूत आसतात. तिच्यावर जे कुटुंबातून संस्कार केले जातात म्हणजे स्त्रीपुरुष विषमतेची मुळे पितृसत्ताक कुटुंबसंस्थेत असतात. यांचे प्रतिबिंब इतर सामाजिक संस्थामध्येही दिसते. उदा. शासन संस्था राजकारणावर, धार्मिक कल्पनांमध्ये व रुढीपरंपरेमध्ये दिसते. या सर्व बाबी मिळून पितृसत्ताक समाज निर्माण होतो. स्त्रीला मुलाची आई असल्याशिवाय स्वतःचे काही अस्तित्व उरलेलेच नसते. भारतीय स्त्रीचे कौटुंबिक जीवन देव-धर्म, उपासतापास, सण- समारंभ, वृत्तवैकल्ये, हळदी-कुंकू या सांस्कृतिक कार्यक्रमांधून नियंत्रित केले जाते. त्या कुटुंबांमधून एक बाई म्हणून, एक पत्नी म्हणून व आई म्हणून अतिशय शांतपणे व्यक्त होतात. या भूमिकांना वळसा घालून पुढे जाण्याचा प्रयत्न त्या करत नाहीत.

RESEARCHJOURNEY

**मुलीला वाढविण्याची खास प्रक्रिया :**

भारतातील पितृवंशियतेच्या चौकटीमागे सांस्कृतिक संकल्पना आहे ते तिचे एक मूल्य आहे. स्त्रीच्या जन्मापासून ही सामाजिक चौकट तिला दुय्यमत्त्व प्रदान करते. मुलगा आणि मुलगी यांची भूमिका भविष्यातील प्रौढ म्हणून कशी घडवायची याविषयीच्या संकल्पना आणि प्रशिक्षणही कसे द्यायचे हे कुटुंब ठरवते. कुटुंबातील सदस्यांच्या जबाबदाऱ्या कोणत्या आणि बंधने, कर्तव्ये कोणती यांचे प्रशिक्षणही कुटुंबात दिले जाते. कुटुंबाचा जो धर्म मानतो आणि आचरणात आणतो त्याचे वरील तत्त्वांशी घनिष्ठ नाते आहे. कौमार्याबद्दल केला गेलेला विशेष दर्जा, वयात येण्याचे केले जाणारे कर्मकांड स्वरुपी सोहळे, विवाहित असल्यानंतरचे केले जाणारे उदात्तीकरण आणि मातृत्त्व या सर्व मुद्यांच्या विचार लीला दुबे बालिकांच्या लैंगिकतेचे धर्मकारण या संकल्पनेअंतर्गत स्पष्ट करतात.[५]

लीला दुबे यांच्या मते अगदी प्राथमिक पातळीवर अत्यंत खाजगी जिव्हाळयाच्या चौकटीत जे संस्कार होतात त्यांचा आंतरिकीकरणातून आदर्श हिंदू स्त्रीत्त्वाला भरीव आकार आणि जिवंतपणा दिला जाऊन त्यातून एक महान आशय घडवला जातो व कुटुंबसंस्थेमध्ये स्त्रियांना हक्काचे दुय्यमत्त्व या तत्त्वाच्या आधारे ठरते.

**विवाह :**

स्त्रियांच्या प्रश्नांचा अभ्यास करताना एकंदरित विवाहसंस्थेचे स्वरुप व त्या संबंधी येणारी गृहीतके यांचा अभ्यास सांस्कृतिक क्षेत्रे समोर ठेऊन करावा लागणार आहे. स्त्रियांचे आयुष्य कुटुंब आणि विवाह या

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 54 : Emerging Trends and Issues in Research
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-714
March 2018

क्षेत्रांशी जखडलेले आहे. पितृवंशीय समाजव्यवस्थेमध्ये मुलींचे लग्न आणि गर्भधारणा यांना स्त्रियांच्या जीवन विशेष महत्त्व अधोरेखित केले आहे. तिच्या जीवनात मातृत्त्व हीच सर्वोच्च मिळकत आहे असे मानले जाते आ मुलीच्या लैंगिकतेचे व्यवस्थापन भविष्यात ती माता होणार आहे या गृहितकाभोवती कुटुंबांमार्फत समाज संस्कृती करून घेते. त्यासाठी लग्नाची आवश्यकता प्रतिपादन करण्यासाठी समाज धर्माच्यामार्फत विवि चालीरीतीची निर्मिती करतो. आशिर्वाद आणि वृत्तवैकल्य शिव किंवा विष्णू यांच्यासारखा नव मिळवण्यासाठी केली जातात. पार्वतीने शंकर हा नवरा मिळावा म्हणून जी तपश्चर्या केली ती पूजा व उपवा करून मोठ्या प्रमाणात जाहीरपणे साजरी केली जातात. तसेच विवाह हेच स्त्रीचे भाग्यधेय समजले जा विशेषत: कन्येचे दान करणे याला एक अध्यात्मिक गुणवत्ता आहे असे मानणे किंवा विवाहितेचे मांगल्य आ विधवेचा अमंगलपणा, आंतरजातीय विवाहामधील अनुलोम, प्रतिलोम नियम किंवा विवाह झाल्याव परावर्तित होतो असे मानणे(काही वेळा स्त्रीचा पुनर्जन्म होतो असे मानणे),आणि वैवाहिक कुटुंबांमध्ये विधीव सामावून घेताना या व्यवहाराला धार्मिक स्वरुप देणे हे सर्व लक्षात घेतले तर हे घटक पितृवंशीय व्यवस्थे आंतरिक घटक नाहीत तर हिंदू असणाऱ्या भारताशी वैशिष्ट्यपूर्ण रीतीने संलग्न असे हे घटक आहेत.

**धर्म, जातीव्यवस्था व स्त्रिया :**

समाज व व्यक्ती यांचे नाते सांस्कृतिक व सामाजिक आहे. धर्म हे नाते नियंत्रित करतो. धर्म म्हण आचारविचारांचे समाजाने ठरवून दिलेले नियम ! या नियमांवरच सामाजिक मूल्ये अधारलेली असतात. प्रत्ये समाज हा लहान किंवा मोठा समूह असतो व सामाजिक नियम संघाअंतर्गत व्यक्तीसाठी जे असतात संघांबाहेरच्या व्यक्तींना लागू पडत नाहीत.[६] मानवाच्या इच्छा ज्या सांस्कृती धर्माने बांधल्या जातात त्या धर्माने त्या मानवाच्या देवता मुर्ती व पुजेचे प्रकार ठरवले जातात. दैवी शासनसंस्थेवरची मनुष्याची श्रद्ध इतकी बळकट असते की त्या श्रद्धेमुळे आचाराचे नियंत्रण होऊ शकते.

RESEARCH JOURNEY

भारतातील जातीव्यवस्था आणि पितृवंशकता हे एकमेकांना कसे घडवितात यांचे सैद्धांतीकरण इतिहासानुसार करणे जसे आवश्यक आहे तसेच यातून येणाऱ्या पर्यायी संकल्पना पितृवंशकतेव्यतिरिक्त इत व्यवस्थांमधून कशा येतात आणि त्यामुळे पितृवंशक आणि जातीव्यवस्था यांचा नियमांच्या प्रत्यक्ष व्यवहाराव देखरेख करण्याचे कार्य या पर्यायी संकल्पनांनी केली की नाही याचाही अभ्यास व्हावा, असे लीला दुबे सुचवतात.[७] भारत नावाच्या उपखंडात स्त्रियांच्या जीवनक्रमाला निश्चित असा अर्थ देणारा हा घटक आहे पितृप्रधान व्यवस्थेची पाळेमुळे जातिव्यवस्थेला पायाभूत असणाऱ्या चौकटींमध्ये ही रूजलेले दिसतात. जातीव्यवस्थेमध्ये स्त्रीच्या लैंगिकतेवर नियंत्रण घातले जाते. स्त्रियांच्या लैंगिकतेवरील नियंत्रण हे जातिजातीमधील तटबंदी टिकवून ठेवण्याशी जोडलेले आहे आणि त्याचा संबंध पितृवंशकता नावाच्या घटकांशी प्रत्यक्ष स्वरुपाचा नाही.[८] हुंडा पध्दतीच्या अभिव्यक्तीमध्ये पुरुषश्रेष्ठत्त्वाचे तत्त्व दिसते. हे तत्त्व जातिव्यवस्थेच्या विचारप्रणालीतून अंतिमत: जन्माला येते. हे तत्त्व धार्मिक, सांस्कृतिक संकल्पना जिला आपण कन्यादान असे म्हणतो तिच्याशी संमिलीत करून येते.

**स्त्रियांच्या सामाजीकरणाची प्रक्रिया :**

स्त्रियांच्या सामाजीकरणाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी नातेसंबंधाच्या (गोतावळयाची) व्यवस्थेची विशिष्टता समजावून घ्यावी लागेल. नातेसंबंध व सामाजिक प्रक्रिया याचा घनिष्ठ संबंध आहे. समाजाचे शेवटचे एकक कुटुंब व त्या कुटुंबाच्या नातेसंबंधातील कुटुंब यांना जातीसंस्थेने घट्ट बांधलेले असते. त्यांचे व्यवहार हे जातीने ठरवून दिलेल्या चौकटीतच होत असतात. जात विवाह संस्थेला नियमबद्ध करून आणि लैंगिक नात्यावर

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 54 : Emerging Trends and Issues in Research
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018

नियंत्रण ठेवून हे सर्व घडवले जाते. यामुळे जातीचा हिंदू धर्मामधील श्रेष्ठ वा कनिष्ठ दर्जा टिकवला जातो. म्हणून जातीच्या सिमारेषा टिकवण्याची जबाबदारी स्त्रियांच्या खांद्यावर येते. शरीरधर्मानुसार जैविक पुनरुत्पादनाच्या दृष्टीने त्यांची भूमीका अपरिहार्य असते. आईची जात आपत्याच्या जातीच्या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. तिच्या जातीवरून आपत्याची जात ठरत असते. अशा तऱ्हेने जातीव्यवस्था भारतीय समाजामध्ये बाई म्हणून वाढविण्याच्या प्रक्रियेमध्ये स्त्रीच्या जीवनाला एक विशेष पोत निर्माण करते.[९] म्हणून स्त्रियांचे वर्तन हे त्यांच्या जातीचा धार्मिक व सामाजिक दर्जा ठरवण्यात महत्त्वाच्या ठरतात. आंतरजातीय विवाह किंवा आंतरधर्मीय विवाहाला विरोध यामुळेच होतो. असे विवाह झाले तर कुटुंबांबरोबरच त्या कुटुंबांचे नातेसंबंधातील कुटुंबही या घटनेला विरोध करतात. या विरोधाचे स्वरुप भयानक असते. अशा कुटुंबांवर सामाजिक बहिष्कार टाकला जातो. किंवा त्या मुलीशी माहेरच्या व सासरचे कुटुंब कोणताही सामाजिक वा धार्मिक संबंध ठेवत नाहीत. बऱ्याचवेळा जाती किंवा धर्माबाहेर विवाह करण्यास उत्सुक असणाऱ्या मुलीला तिचे वडील, भाऊ किंवा जवळचे नातेवाईक तिची हत्या करतात. जाती नियमांचे आणि नितीमत्तेचे उल्लंघन केल्यामुळे स्त्रीला ही भयाण शिक्षा भोगावी लागते.

एकंदरीत पुरुष आणि स्त्रिया यांच्या लैंगिकतेमध्ये असणारी मूलभूत भिन्नता ही सांस्कृतिक अकलनावर बेतलेली असून त्यानुसार जातीव्यवस्था घडते. त्याच्या पुढे जाऊन या जातीअंतर्गत दोन लिंगामध्ये पुन्हा उतरंडीची रचना असते. लिंगभेदानुसार उतरंड असणे हे ब्राम्हण आणि इतर शुद्र जातीचे खास वैशिष्ट्ये आहे.

**कुटुंबव्यवस्था व स्त्रिया :**

पितृवंशीय कुटुंब रचनेचा पाया स्त्री-पुरुष यांच्या लिंगभावाच्या विषमतेवर आधारलेला आहे. म्हणून कुटुंबाच्या संसाधनाचे वाटपही लिंगभेदाच्या विषमतेवर आधारित असते. पितृवंशाचा गाभा म्हणजे स्त्रियांच्या सदस्यत्त्वामध्ये स्थलांतर घडवणे आणि अर्भकांना पितृवंशीयतामध्ये सामावून घेणे.[१०] हे कुटंबव्यवस्थेमध्ये घडत असते.

कुटुंब नावाच्या संस्थेमध्ये पडदा, स्त्रियाचा स्वतंत्र कप्पा, बाईची बाई म्हणून योग्य वागणूक इत्यादी सर्व गोष्टी या स्त्रीच्या लैंगिकतेवर संस्थात्मक नियंत्रणाची उदाहरणे आहेत.योग्य वयात योग्य जातीत विवाह ही गोष्ट म्हणजे कुटुंब नावाच्या अवकाशामध्ये वाटाघाटी आणि व्यवस्था करून साध्य करायच्या गोष्टी आहेत.

कुटुंब संस्थाच्या अभ्यासामध्ये विसंगती दिसते ती अशी की, जे संशोधन झाले त्यांना आपले लक्ष केंद्रित केले ते बदलांचा परिणाम कसा होतो. या मुद्यावर बहुतांश स्वरुपाच्या हे संशोधन आधुनिक कुटुंबाच्या रचना आणि स्वरुपाच्या औद्योगिक आणि शहरीकरण यांचे परिणाम काय होतात या मुद्याशी मर्यादित राहिले. पण कुटुंबव्यवस्था स्त्रियांचे दुय्यमत्त्व कसे घडवते त्याला धार्मिक व समाजशास्त्रीय चौकट कसे सहाय्य करते तसेच इतर संस्था व राज्यकर्त्यांची धोरणे याचा परिणाम काय होतो यावर मात्र संशोधन झाले आहे.

अन्य पारंपारिक आणि आधुनिक संस्था पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या घडणीला हातभार लावतात. यामधील जातीनिहाय संस्था आणि त्यांची विचारप्रणाली, राज्य संस्था आणि तीची धोरणे धार्मिक संस्था, अर्थव्यवस्था, माध्यमे. थोडक्यात संस्कृती आणि समाज एका व्यापक प्रमाणात सहभागी असतात. पुरुष आणि स्त्रीविषयक काही विशिष्ट कल्पना या सर्व संस्था गृहीत धरतात आणि प्रकल्पित करतात तेव्हा अपरिहार्यपणे कुटुंब आणि घरदाराच्या साच्यामध्ये झिरपत जातात.[११]

ज्यामध्ये पुरुषी वर्चस्व हे विविध प्रमुख संस्थात्मक पातळयांवर नियमांच्या स्वरुपात अभिव्यक्त होतो आणि अशा समाजामध्ये बऱ्याच वेळा गोतावळा पितृवंशीय असतो. हे खरे असले तरी तसेच असेल हे गृहीत धरता येत नाही.

**निष्कर्ष :**

स्त्रीच्या घडवणुकीमध्ये कुटूंब, त्याची जात व धर्म, त्या जात व धर्माची सांस्कृतिक चौकट, या सांस्कृतिक चौकटीच्या दृढीकरणासाठी समाजाने केलेली रीतीरिवाज, त्याला लाभलेले धर्माचे अधिष्ठान हे महत्त्वाची भूमीका बजावतात. या भूमीका योग्य पध्दतीने पार पडतात का नाही यावर त्या कुटुंबाच्या गोतावळ्याची खास नजर असते. या भूमिकेमध्ये कसूर आढळ्यास त्या कुटुंबाला गोतावळा बहिष्कृत करतो. ही सर्व समाजव्यवस्था पितृप्रधान म्हणून ओळखली जाते. आधुनिक युगात ही व्यवस्था बदलू पहात आहे. जागतिक पातळीवर व भारतातही लिंगभेद नाहीसे करून स्त्री-पुरुष समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात संशोधन केले जात आहे. आतापर्यंत कुटुंबसंस्थेचा अभ्यास हा रचना आणि तिच्या स्वरुपाच्या औद्योगिकरण आणि शहरीकरण यांचे कुटुंबावरील परिणाम यापुरते मर्यादित झाले आहे. पण स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी कुटुंबाची पुनर्चना होणे गरजेचे आहे या दृष्टीने पुढील काळात संशोधन होणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

१. पितृसत्ता व स्त्रीमुक्ती, वंदना सोनाळकर शर्मिला रेगे, क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर, तृतीय आवृत्ती, २००७, पृ. २.
२. संपादक, भास्कर लक्ष्मण भोळे, किशोर बेडकिहाळ, शतकांतराच्या वळणावर, विचारवेध संमेलनातील निवडक निबंधाचा संग्रह, (विसाव्या शताकातील स्त्रियांच्या परिर्वतनवादी चळवळीची वाटचाल, छाया दातार यांचा लेख) आंबेडकर आकादमी सातारा, पहिली आवृत्ती २००६.पृ. २२)
३. पितृसत्ता व स्त्रीमुक्ती, वंदना सोनाळकर शर्मिला रेगे, क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर, तृतिय आवृत्ती, २००७, पृ. ३.
४. पद्मजा पाटील व शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रिया फडके प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृत्ती, २००७, पृ.१४७.
५. पितृसत्ता व स्त्रीमुक्ती, वंदना सोनाळकर शर्मिला रेगे, क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर, तृतीय आवृत्ती, २००७, पृ. १३.
६. मानव शास्त्रातील लिंगभावाची शोध मोहीम, लीला दुबे, अनुवादक विद्युत भागवत, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९, पृ. ९०.
७. उपरोक्त, पृ. २०.
८. उपरोक्त पृ. १९.
९. उपरोक्त, पृ. ६८.
१०. उपरोक्त, पृ. १९.
११. मानव शास्त्रातील लिंगभावाची शोधमोहीम, लीला दुबे, अनुवादक विद्युत भागवत, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९, पृ. २०.